नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १७/०८/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील सरस्वती नगर, कठाणे ले–आउट काटोल येथे दिनांक १०/०८/२०२२ चे १५.०० वा. ते दिनांक १६/०८/२०२२ चे १८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ.मंदाबाई चक्रधर मेश्राम, वय ५६ वर्ष, रा. सरस्वती नगर कठाणे ले–आउट काटोल हि तिचे पतीचे प्रकृतीचे उपचाराकरीता नागपूर येथे दि. १०/०८/२२ रोजी १५.०० वा. घराचे दाराला कुलुप लावुन परीवारासह गेली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचा दाराला लावलेला कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीचे घरातील बेडरूम मधील लोखंडी कपाटातील कि. ७,०००/–रु. व नगदी ५००/–रु. असा एकुण कि. ७,५००/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस नाईक सुनिता साठोणे मो नं ७७२२०३६७४४ या करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील खोजा ले आउट काटोल येथे दिनांक १२/०८/२०२२ चे ०९.३० वा. ते दिनांक १६/०८/२०२२ चे १७.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– देवेन्द्र रामचंद्र चरडे, वय ५१ वर्ष, रा. शनी चौक काटोल यांचा मोठा भाउ त्यांचे परीवारासह मुलगा गौरव यास भेटण्याकरीता जिल्हा अहमदनगर येथे दिनांक २२/०७/२२ रोजी घराचे दाराला कुलुप लावुन गेले होते. फिर्यादी हे त्यांचे घराकडे दररोज जाणेयेणे करीत होता. दिनांक १२/०८/२०२२ पासुन फिर्यादी हा त्याचे भावाचे घराकडे गेलेला नाही. दि. १६/०८/२२ रोजी १७/३० वा. दरम्यान फिर्यादीने त्याचे भावाचे घराकडे जावुन बघितले असता त्यास घराचे दाराला लावलेला कुलुप तुटलेला दिसुन आला. त्याने घरात जावुन पाहणी केली असता घरातील बेडरूम मधील लोखंडी कपाटातील सामान अस्तव्यस्त पडलेले दिसले व लोखंडी कपाटातील सोन्या–चांदीचे दागिने असा एकुण कि. ७७,०००/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री जवाहर चव्हाण मो.क्र. ९०६७९६७१८१ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील रेल्वे लाईन जवळ पिपळा डाक बंगला शिवार ता. सावनेर येथे दिनांक १५/०८/२०२२ चे २१.०० वा. ते २२.०० वा. सुमारास आरोपी हे पिपळा डाग बंगला शिवारात रेल्वे डिपार्टमेंटचा अंडरग्राउंड ब्रीज चा सुरू असलेले बांधकाम मध्ये लागलेली १० एम एम चे ४ मीटर असलेली लोखंडी रॉड एकुण २० रॉड कींमती ३,०००/—रू. चा माल व घटनास्थळावरून मोटरसायकल हिरो डीलक्स क्रं. एमएच— ४०/बीयु— ७४९७ किमती ३०,०००/—रू. वर चोरी करतांना मिळुन आले. यातील आरोपी क्रं १) दिपक गंगाधर केळवदे वय २५ वर्ष, रा. दहेगाव रंगारी, खापरखेडा याला फिर्यादी याने चौकीदाराचे मदतीने व पिपळा गावकरी लोकांचा मदतीने पकडले व त्याचा सोबत असलेल्या साथीदार आरोपी क्र. २. शुभम मेश्राम वय २४ वर्ष रा. दहेगाव रंगारी ता. सावनेर हा मोक्यावरून पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार विठ्ठल वंजारी मो.क्रं. ८००७५६३३५३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बेला** :— अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील मौजा सिर्सी येथे दिनांक १४/०८/२०२२ चे १०.०० वा. ते ११.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. रंजना अशोक रनदिवे, वय ५२ वर्ष, रा. भद्रावती जि चंद्रपूर ही सिर्सी येथून हिंगणघाट कडे जाणारी एयटी बस मध्ये चढत असता तिच्या आजू बाजूला चार ते पाच महीला गोळा झाल्या. त्या महिलांमधील दोघींनी तोंडाला स्कार्प बांधलेला होता. फिर्यादी हीला एसटी बसमध्ये चढल्यावर फोन आल्याने तीने मोबाईल घेण्याकरीता हॅन्डबॅग कडे पाहीले असता हॅन्ड बॅगची चैन उघडी दिसली परत बोलनी केल्यानंतर मोबाईल हॅन्ड बॅग मध्ये ठेवला असता बॅग मधील आतील चैन उघडी दिसली. त्यामध्ये सोन्याचे भांडे ठेवलेला डब्बा दिसला नाही. डब्ब्यामध्ये ठेवलेले १. सोन्याचे पदक व चापट पट्याची डिझाईन असलेले व त्याच कवळे मनी असलेले मंगळसूत्र कि. १,००,०००/—रू., २. सोन्याचे मंगळसूत्र डोरले असलेले कि. ३७,०००/—रू. ३. सोन्याचे एक जोड कानाचे झूमके कि. १२,०००/—रू., ४. सोन्याचे नेकलेस कि. २५,०००/—रू. असा एकुण कि. १,७४,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुनिल आदमने मो.क्र. ९८९०३२१९४० हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा पाझरा काटे शिवार येथे दिनांक १३/०८/२०२२ चे १८.०० वा. ते दिनांक १५/०८/२०२२ चे १५.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रमोद शेशराव चाफले, रा. राम नगर कोढाळी यांचे मालकीचे पाझराकाटे शिवारात ०८ एकर शेती असनु फिर्यादीला शुभम कंगाली याने फोन करून सांगीतले की, 'तुमचे शेतात चंदनाचे तुकडे पडलेले दिसत आहेत.' त्यावरून फिर्यादी याने शेतात पाहनी केली असता शेतात ११ वर्षाच्या ०५ चंदनाची झाडे तोडलेले दिसले व त्यातील लाकुड शेतात फेकलेले असुन त्या चंदनाचा झाडाचा गाभा कापुन अज्ञात आरोपीने किंमती ७५,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार दारासिंग राठोड मो.न.९८६०४२७९०२ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत २१ कि. मी. अंतरावरील मौजा छत्रापुर बस स्टॉप जवळ येथे दिनांक १६/०८/२२ चे १२.३० वा. सुमारास आरोपी नामे— राजेंद्र धनराज वाढी, वय ४० वर्ष, रा. छत्रापुर ता. सावनेर याने त्याचे ताब्यातील बजाज XCD मोटरसायकल क्र. एमएच—४०/एम— ६१९६ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडच्या कडेला सुरक्षेकरीता लावलेल्या लोखंडी अँगल (ग्रील) ला धडक दिली. या अपघातात आरोपी हा स्वत: चे जखमी होवुन मरण पावण्यास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सुनिल धनराजजी वाढी, वय ३६ वर्ष रा. छत्रापुर ता. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार रामराव पवार मो.न. ७८७५९८३३६० हे करीत आहे.

## ढाब्यामध्ये गोमास बाळगणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा बोरखेडी शिवार हरियाना मेवात ढाबा येथे दिनांक १६/०८/२०२२ चे १७.३० वा. सुमारास आरोपी नामे— फकरू खान असरफ खान, वय ३८ वर्ष, रा. गाव बसइ मेवो, घर क्र. १४९ ता. फिरोजपुर सिरका जि. मेवात, हरीयाना ह.मु. गोदावरी नगर, बुटीबोरी याने यांच्या ढाब्याची गोमासाबाबत झडती घेतली असता हरीयाना राजस्थान मेवात ढाब्यात टीनाचे शेडखाली असलेल्या फ्रिजरमध्ये एका स्टीलचे गंजात गोमासारखे लहानमोठे तुकडे हाडासह भरलेले मिळुन आले. त्यावरून सदरचे मास हे खात्री करणे असल्याने पशु वैदयकीय अधिकार कार्यालय बोरखेडी यांना माहीती दिले. यावरून आरोपीचे ताब्यातुन स्टीलचे गंजासह गोमास एकुण कि. ३,४३३/—रू. चा गोमास अवैदयरीत्या विक्री करीत बाळगुन मिळुन आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशि राकेश तालेवार पोस्टे बोरी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारण अधी. १९९५ कलम ५ (क), ९(अ) सहकलम ४२९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री साखरकर मो.नं. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## गोवंशाचे चामडे वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा धनकापूर येथे दिनांक १४/०८/२०२२ चे ०५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— हर्शल प्रदिप मोहटे, वय २० वर्ष, रा.डोंगेघाट, खापा ता.सावनेर यांना एम.एच—३४/ए. बी—४०११ क्रमांकाच्या ट्रक मधुन एम.एच—४०/वाय—४१२० क्रमांकाच्या ट्रकमध्ये गोवशांचे चामडे शिफ्ट करतांनी आरोपी नामे— सोनेसिंग आत्मज सपुत सिंह, वय ३० वर्ष रा. तिदुनी ता.तिदूनी जिल्हा पन्ना मध्येप्रदेश हा मिळुन आला. फिर्यादीने पोस्टे खापा येथे कळवुन पोलीस तेथे हजर आले व ट्रक ची पाहनी केली असता सदर ट्रक मध्ये गाई बैलाचे जनावराची कातडी किंमती ७,२७,२००/— रू. चा माल मिळुन आला. तसेच प्रत्येकी १२ चक्का ट्रक ची कि.१२,०००,००/—रू असा २ ट्रक ची किमत २४,०००,००/—लाख एकुण किमती ३१,२७२,००/— रू. चा मुद्देमाल मिळुण आला. सदर मुद्देमाल घटणास्थळी जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा कलम ५,५(सी),९,९(ऐ),आर/डब्लु सहकलम ४२९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि कलेगुरवार मो.नं ९१७५५७९१४३ हे करीत आहे.

<u>अकस्मात मृत्यू</u>

<u>१) पो.स्टे. खापरखेडा</u> :— अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील मौजा लौणखैरी येथे दि. १६/०८/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास **सुधाकर बालाजी तुमडाम(मृतक), वय २८ वर्ष, रा. लोणखैरी** हा फिर्यादीचा लहान मुलगा असुन तो दारू पिण्याचा सवयीचा होता. फिर्यादी हा मोठा मुलगा नामे— देवीदास तुमडाम यांचे घरी नागपुर येथे पत्नीसह गेला असता घरी मृतक हा एकटाच होता. फिर्यादीचा साळा गोपाल मडावी रा. लोणखैरी याने फोनव्दारे फिर्यादीला सांगितले की, सुधाकर हा घरी खाली पडुन आहे व त्याने विषारी औषध प्राषण केल्याने तो मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— बालाजी हिमंतसिंग तुमडाम, वय ५५ वर्ष, रा. लोणखैरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार शरद डोंगरे मो.क्रं ८७६६९९७०६३ हे करीत आहे.

<u>२) पो.स्टे. मौदा</u> :— अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील नानादेवी शिवार कन्हान नदीचे पात्र येथे १६/०८/२२ चे १३.३० वा. सुमारास यातील **मृतक— अनोळखी पुरूष, वय अंदाजे ५० ते ६० वर्ष** यांचे प्रेत घटनास्थळी कन्हान नदिचे प्रवाहातील झाडी झुडपात बुडलेल्या स्थितीत दिसून आले.

**मृतकाचे वर्णन**:— वय अंदाजे ५० ते ६० वर्ष, रंग सावळा, बांधा मजबूत, उंची ५ फुट ५ इंच, कमरेला लाल रंगाचा कळदोडा, शरीर कुजलेला, डोक्याचे केस काळे—पांढरे, मिशी पांढरी, अंगात कपडे नाही (नग्न) आहे. याबाबत कोणालाही माहिती असल्यास पो.स्टे. मौदा येथे मो.क्र. ७०३८८२२२०५ किंवा टेलीफोन क्र. ८६६८२४३८९५ वर कृपया संपर्क साधावा.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सागर सिताराम बावने, वय २४ वर्ष, रा. नानादेवी हे नानादेवी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि श्री प्रमोद चौधरी मो.क्र. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

<u>२) पो.स्टे. सावनेर</u> :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील सावनेर ते पाटणसावंगी रोड येथे दि. १२/०८/२०२२ चे १४.०० वा. सुमारास **रविन्द्र परसराम जाधव (मृतक), वय ५५ वर्ष, रा. पाटणसावंगी ता. सावनेर** हे आपल्या मोटरसायकलने घरी परत जात असतांना घटनास्थळी त्यांचे मोटरसायकल समोर अचानक माकड आल्याने त्यांची मोटरसायकल स्लीप झाली. ते जख्मी झाल्याने त्यांना उपचाराकामी एलेक्सीस हॉस्पीटल नागपूर येथे भर्ती केले असता उपचारादरम्यान ते मरण पावले. पो.स्टे मानकापूर नागपूर शहर येथून कागदपत्रे व ००/२२ कलम १७४ जाफौ प्रमाने मर्ग ची डायरी पो.स्टे. सावनेर ला प्राप्त झाल्याने तसेच मृतकचे भाउ यांचे बयानावरून व मर्ग संबंधीत कागदपत्रावरून सदरचा मर्ग दाखल करून चौकशीत घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— **गिरीश परसराम जाधव (मृतक), वय ५० वर्ष, रा. पाटणसावंगी ता. सावनेर** यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार बंडू कोकाटे मो.क्र. ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**